प्रशासकीय मान्यता

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राज्य योजनेंतर्गत मंजूर झालेल्या अनुदानातून संस्थेकरिता यंत्रसामुग्री खरेदीस प्रशासकीय मान्यता.

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : जीडीएन-२०१९/प्र.क्र.२३४/प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

वाचा :
१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८
४) संवैशिवसं/शादंमरुना/खरेदी विभाग/राज्य योजना/२०१९-२०/१-म/१२४९७/ २०१९, दि. २९.०८.२०१९

शासन निर्णय :-

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेस सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राज्य योजनेंतर्गत रुपये ६४,५२,७१२/- (अक्षरी रुपये चौसष्ठ लक्ष बावन हजार सातशे बारा फक्त) मंजूर झालेल्या अनुदानातून संस्थेकरिता यंत्रसामुग्री खरेदीस पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	यंत्राचे नाव	आवश्यक नग संख्या	प्रतिनग किंमत	एकूण किंमत
१	ऑटोमेटीक गन टाईप क्रॉऊन रिमुवर	०५	३०००	१५०००
२	वॉटर डिस्टीलायजर	०६	१४५००	८७०००
३	कमरशियल ऑक्सीजन सिलेंडर	०२	१४२७८	२८५५६
४	फ्रन्ट लोडींग ऑटोक्लेव	०१	२८००००	२८००००
५	पोर्टेबल एक्स रे मशिन	०१	१६५०००	१६५०००
६	पिडयाट्रिक मॅनिकीनस विथ सिमुलेशन युनिट	०१	३०००००	३०००००
७	मल्टी विनस आय व्हि ट्रेनिंग आर्म किट	०१	२९६०००	२९६०००

८	इनफंट सीपीआर ट्रेनर विथ फिडबॅक मॉडल	०१	८५०००	८५०००
९	ग्रॉसींग टेबल	०१	२९९८८०	२९९८८०
१०	डेन्टिन ग्राईंनडर किट	०१	२७४५९६	२७४५९६
११	ओ.टी. एलईडी लाईट विथ स्टॅन्ड	०२	३५८४०	७१६८०
१२	डेंटल चेअर्स विथ एक्सेसीरीज	१४	२७५०००	३८५००००
१३	पिडयाट्रीक डेंटल चेअर्स विथ एक्सेसीरीज	०२	३५००००	७०००००
		एकूण किंमत		**रु. ६४,५२,७१२/-**

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता संबधित संस्थेस सन २०१९-२० या आर्थिक वर्षात राज्य योजनेंतर्गत मंजूर योजेनद्वारे उपलब्ध निधीतून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता तसेच बांधकाम / विद्युतीकरणाची नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा केली आहे.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/ प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे खरेदी समितीने अनुपालन करावे. त्यानुषंगाने यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी उपरोक्त तक्यात नमूद केलेल्या यंत्रसामुग्री खरेदीसाठी येणारा खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावा.

मागणी एस- ४

४२१०	-	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०५	-	वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन
१०५	-	विषमचिकित्सा, राज्य योजनांतर्गत योजना
(००) (३८)	-	शासकीय दंत महाविद्यालयांचे बळकटीकरण व दर्जा वाढ करणे. (००) (३८) (४२१० १७२७)
(५२)	-	यंत्रसामुग्री व साधनसामुग्री

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९११२१०२०८१५१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARUN MURLIDHAR RAO DAHALE

Digitally signed by ARUN MURLIDHARRAO DAHALE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, postalCode=400032, street=MANTRALAYA ,MUMBAI, serialNumber=30df743755280cf26ce97ec0978235f63f80f0bc4317129bf381eb48778f2e3d, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARUN MURLIDHARRAO DAHALE
Date: 2019.09.13 15:12:30 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - २ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर .
७. निवडनस्ती (प्रशा-१).